महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा घोडविंदे (एम.डी.)

रविवार ■ ०९ नोव्हेंबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक : १३४ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

लक्षवेधी

## एसटी कर्मचाऱ्यांचा बँक खात्यात पगार

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई** : राज्य सरकारने एसटी महामंडळाला सवलतमूल्याचा निधी न दिल्याने एसटी कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यात पगार जमा होऊ शकलेला नाही. दर महिन्याच्या ७ तारखेला कर्मचाऱ्यांना पगार मिळतो. परंतु, सवलतमूल्याची रक्कम मिळण्यास विलंब झाल्याने एसटी कर्मचाऱ्यांचा पगार रखडला.

आता राज्य सरकारने एसटी महामंडळाला सप्टेंबर २०२५ च्या सवलतमूल्याच्या प्रतिपूर्तीपोटी ४७१.०५ कोटी रुपये निधी वितरित करण्यास गृह विभागाने मंजुरी दिली आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यात सोमवारी पगार जमा होईल, असे सूत्रांनी सांगितले. एसटी महामंडळाच्या माध्यमातून प्रवास करणाऱ्या राज्यातील हजारो प्रवाशांसाठी विविध सवलती योजना आहेत. या योजनांच्या माध्यमातून प्रवासी तिकीट दरात ३३ टक्क्यांपासून १०० टक्क्यांपर्यंत सवलत देण्यात येते. यात ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत तिकीट भाडे, महिलांसाठी अर्धे तिकीट योजनेचा समावेश आहे. या सवलतींचे उत्तरदायित्व राज्य सरकारचे आहे. त्यामुळे ६७ टक्के ते पूर्णपणे तिकीटाचे भाडे राज्य सरकार भरते.

## भिवंडी येथे रेशनच्या धान्याची काळया बाजारात विक्री



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर** : तालुक्यात आदिवासी विकास महामंडळ विभागात भात खरेदीमध्ये कोट्यवधी रुपयांच्या घोळाची चौकशी सुरू असतानाच भिवंडी येथील शासकीय गोदामातून शहापूर तालुक्यातील अघईमधील रेशन दुकानात नेले जाणारे धान्य काळयाबाजारात विक्रीसाठी जात असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी शहापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून ट्रकचालक एजाज शहा याला अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी ट्रकमधून १६५ क्विंटल गहू व तांदूळ जप्त केला आहे.

**ट्रक शहापुरातील एका खाजगी गोडाऊन समोर कसा काय ?** याबाबत अनेक प्रश्न निर्माण झाले असून यामुळे शहापूर तालुका शासकीय धानाची काळया बाजारात विक्री करण्याचे आगार बनले आहे की काय असा प्रश्न निर्माण झाला आहे. तसेच गोरगरिबांच्या तोंडचा घास हिरावून नेणाऱ्या धान्य तस्करांची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करावी अशी मागणी केली जात आहे.

**१६५ क्विंटल धान्य जप्त**

# सांस्कृतिक मूल्यांमुळेच देशात सशक्त लोकशाही

### - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई** : आपल्या शेजारी देशांमध्ये लोकशाही टिकू शकली नाही. मात्र, भारतात ती अधिक चांगल्या प्रकारे रूजली, कारण आमची मूळ संस्कृतीच लोकशाही आणि सहिष्णूतेच्या मूल्यांवर आधारित आहे. तीच मूल्ये आमच्या संविधानात समाविष्ट असल्याने आम्हाला मजबूत असे संविधान मिळाले आहे. यामुळेच आमचा देश प्रगती करतोय आणि लोकशाही देखील सशक्त होत आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले.

संस्कार भारतीच्या अ.भा. वार्षिक सर्वसाधारण सभेच्या उद्घाटन सत्राचे प्रमुख अतिथी म्हणून मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते. रेशीमबागेतील महर्षी व्यास सभागृहात दोन दिवस चालणाऱ्या या सभेच्या उद्घाटन सत्रात गुरुदेव सेवा मंडळाचे सरचिटणीस जनार्दन बोथे, झाडीपट्टी रंगभूमीचे अध्वर्यू पद्मश्री परशुराम खुणे या विशेष अतिथींसह संस्कार भारतीचे अखिल भारतीय अध्यक्ष डॉ. मैसुरू मंजूनाथ, विदर्भ प्रदेश अध्यक्षा कांचनताई गडकरी यांची व्यासपीठावर प्रामुख्याने उपस्थिती होती.एआयसारख्या नवकल्पनामुळे माणसाला यंत्रांशी स्पर्धा करावी लागत असताना, तंत्रज्ञानाने घडवून आणलेली उलथापालथ समजून घेऊन ते योग्य दिशेने वळविण्याचे आणि समाजाला सकारात्मक दिशा देण्याचे कार्य संस्कार भारतीसह सर्वांना करावे लागेल, असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केले.

संस्कार भारतीचे अखिल भारतीय महामंत्री आशीष दळवी, अभिनेते नितीश भारद्वाज यांच्यासह अनेक मान्यवरांची यावेळी उपस्थिती होती. या सर्वसाधारण सभेत देशभरातून सुमारे चारशे प्रतिनिधी सहभागी झाले आहेत. सुरुवातीला संस्कार भारतीचे अखिल भारतीय अध्यक्ष डॉ. मंजुनाथ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे स्वागत केले.

# ठाण्यात सायकल राईडमधून एचआयव्ही-एड्स जनजागृती

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्ष, जिल्हा सामान्य रुग्णालय, ठाणे आणि आम्ही सायकल प्रेमी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आज सकाळी एचआयव्ही-एड्स आणि सिफिलीस बाबत युवकांमध्ये जनजागृतीपर सायकल राईड आयोजित करण्यात आली होती. या सायकल राईडमध्ये पाच वर्षे वयोगटापासून ते ७७ वर्षापर्यंतच्या ज्येष्ठांपर्यंत २८७ सायकल प्रेमींनी सहभाग घेतला.

सर्व सायकल प्रेमींनी आम्हा सगळ्यांना एक शिकवण दिली की, आपण सकाळी लवकर उठून फिटनेसकडे लक्ष दिले पाहिजे, त्यामुळे त्यांच्याकडे पाहून एक नवीन ऊर्जा मिळाली. अनेकांना एचआयव्ही पॉझिटिव्ह आणि एड्स हे दोन शब्द उच्चारले की भीती वाटते. पूर्वी या आजाराबद्दल अत्यंत भीती होती मात्र जनजागृतीमुळे ही भीती दूर झाली, असे मत जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.कैलास पवार यांनी व्यक्त केले.

सकाळी मान्यवरांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून सायकल राईडला सुरुवात झाली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.पवार पुढे म्हणाले की, सर्व सायकल प्रेमींना पाहून आजची सकाळ ही अत्यंत उत्साही आणि ऊर्जा देणारी होती. जसा आता क्रिकेटमध्ये महिलांचा सहभाग वाढत चालला आहे तसाच सायकलिंग मध्ये देखील महिलांचा सहभाग वाढला पाहिजे. कारण त्यांच्या सहभागाशिवाय प्रत्येक क्षेत्र अपूर्णच आहे. अनेकांना एचआयव्ही पॉझिटिव्ह आणि एड्स याबद्दल संभ्रमता आहे परंतु या दोन्ही आजारांमध्ये मोठा फरक आहे. आपली वाटचाल ही निरोगी आयुष्याकडे असली पाहिजे. "एचआयव्ही मुक्त भारत" यासाठी सगळ्यांनी प्रयत्न केला पाहिजे, असे सांगत जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.कैलास पवार यांनी एचआयव्ही पॉझिटिव्ह आणि एड्स या दोघांमधला फरक स्पष्ट केला. एचआयव्ही एड्स जनजागृती बद्दल सायकल राईड आयोजित केल्याबद्दल आनंद होत आहे. युवकांमध्ये मोठ्या प्रमाणामध्ये या आजाराविषयी जनजागृती होणे आजही तितकेच गरजेचे आहे. कारण आजची पिढी ही व्यसनाधिनतेकडे झुकत आहे. आशादायक एक गोष्ट आहे की, या आजारावर असलेली औषधेही प्रगत होत चालली आहेत. यावेळी एड्स या आजाराविषयीची कारणे आणि त्यावरील उपाय या संदर्भात डॉ.पवार यांनी मार्गदर्शन केले. 2010-11 सालचा आणि आत्ताचा सक्सेस रेट पाहिला तर एचआयव्ही पॉझिटिव्हचे प्रमाण कमी होत आहे आणि हे केवळ जनजागृतीमुळे शक्य आहे. अनेक सेवाभावी संस्था या जनजागृतीमध्ये हातभार लावतात त्यामुळे त्यांचे आभार मानावे तितके कमी आहे.

आम्ही सायकल प्रेमी फाउंडेशनच्या वतीने सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाचे अध्यक्ष कमलेश प्रधान यांनी नुकतीच कैलास–मानस सरोवर यात्रा आणि कैलास पर्वत परिक्रमा यशस्वीरीत्या पूर्ण केल्याबद्दल सन्मानपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. यावेळी ते म्हणाले की, ज्यावेळी तुम्ही शरीराने फिट असाल त्याच वेळेला ही यात्रा पूर्ण करा. जसजसे वय होत जाते तसे तसे तुमच्याकडे पैसा आणि वेळ असतो पण शरीर साथ देत नाही त्यामुळे जितक्या कमी वयात तुम्हाला ही यात्रा पूर्ण करता येईल तितक्या लवकर तुम्ही ही पूर्ण करा. जिद्द, चिकाटी, फिटनेस आणि परमेश्वरावरचा विश्वास असेल तर ही यात्रा तुमची नक्की पूर्ण होईल.

यावेळी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.गंगाधर परगे, ठाणे जिल्हा मुख्य दंत शल्यचिकित्सक डॉ.अर्चना पवार, जिल्हा कार्यक्रम अधिकारी रतन गाढवे, आम्ही सायकल प्रेमी फाउंडेशनचे सचिव दीपेश दळवी, वैद्यकीय अधिकारी डॉ.सुरेश महावरकर, जिल्हा पर्यवेक्षक अशोक देशमुख आणि निलिमा पाटील आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुप्रिया पुरी यांनी तर आभार प्रदर्शन रतन गाढवे यांनी केले.

# ठाणेकरांना वाहतूक कोंडीतून सोडवा - अविनाश जाधव

दै.ठाणे जीवनदीप वार्ता /**ठाणे** : आम्ही नियम पाळतो, मात्र संपूर्ण ठाणे शहरात वाहतूक कोंडीची स्थिती....असताना सर्वसामान्यांवर नियम पालनाच्या नावाखाली दंड ठोठावणे...चुकीचे असल्याचे मत मनसे नेते अविनाश जाधव यांनी व्यक्त केले. ठाणेकरांची वाहतूक कोंडीत मुक्तता करा, याविरोधात 'ट्रॅफिक मोर्चा' काढू...असा इशारा देखील यावेळी अविनाश जाधव यांनी दिली आहे.





# शहराच्या शाश्वत विकासासाठी ७ कलमी मूद्यांची प्रभावी अंमलबजावणी करा

### - केडीएमसी आयुक्त अभिनव गोयल

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : सध्या निसर्गाचा ढासळलेला समतोल आणि बदललेले ऋतुमान पाहता अनेक नैसर्गिक आव्हानांना तोंड द्यावे लागत आहे. ही परिस्थिती बदलण्यासाठी आपण सर्वांनी एकत्रितपणे काम करण्याची हीच ती वेळ असून कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने ठरविलेल्या 7 कलमी मुद्द्यांची प्रभावीपणे अंमलबजावणी आवश्यक असल्याचे प्रतिपादन महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी केले. शाश्वत आणि सुरक्षित शहर विकासाच्या दृष्टीने केडीएमसी प्रशासनाने आयोजित केलेल्या चर्चासत्रात ते बोलत होते. कल्याणच्या आचार्य प्रल्हाद केशव अत्रे रंगमंदिरात झालेल्या या चर्चासत्रामध्ये कल्याण डोंबिवलीतील विविध गृहसंकुलांचे अनेक पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

केडीएमसी आयुक्त अभिनव गोयल यांच्या संकल्पनेतून आणि विद्युत - यांत्रिकी विभागाचे अतिरिक्त शहर अभियंता प्रशांत भागवत यांच्या समन्वयातून शाश्वत आणि सुरक्षित शहर विकासाच्या महत्त्वपूर्ण कार्यक्रमाची आखणी करण्यात आली आहे. ज्यामध्ये कचरा व्यवस्थापन, सौरऊर्जा, पावसाचे पाणी साठवण, सांडपाण्याचा पुनर्वापर, वृक्ष लागवड, विद्युत सुरक्षा आणि अग्निसुरक्षा या सात मुद्द्यांचा समावेश करण्यात आला आहे.

यावेळी घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त रामदास कोकरे, अतिरिक्त शहर अभियंता प्रशांत भागवत, कार्यकारी अभियंता शैलेश मळेकर, घनश्याम नवांगुळ, उपआयुक्त संजय जाधव, विभागीय संचालक भूषण मानकामे, मुख्य अग्निशमन अधिकारी नामदेव चौधरी यांच्याकडून वेगवेगळ्या विषयांवर सादरीकरण करण्यात आले. तसेच कचरा व्यवस्थापन, रेन वॉटर हार्वेस्टिंग आदी विषयांवर विक्रम वैद्य, (राजश्री एनवोर्मेन्ट सोल्युशन), संदीप अध्यापक (वॉटर फिल्ड टेक्नॉलॉजीस), सचिन जोशी (एकम इको सोल्युशन ) या तज्ज्ञांनीही यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यानंतर उपस्थित नागरिकांकडून विविध विषयांवर प्रश्नही विचारण्यात आले. यावेळी सहाय्यक आयुक्त धनंजय थोरात, उमेश यमगर, प्रीती गाडे देखील उपस्थित होते.

आयुक्त गोयल यांनी स्पष्ट केले की, "या सात मुद्द्यांवर प्रभावीपणे काम करण्यासाठी गृहसंकुलांनी त्यांच्या स्तरावर छोट्या छोट्या समित्या गठीत केल्या पाहिजेत. आणि या समित्यांच्या माध्यमातून इतर रहिवाशांमध्ये याबाबत जागरूकता करून प्रभावीपणे अंमलबजावणी केली पाहिजे. तसेच या 7 कलमी कार्यक्रमांवर चांगले काम करणाऱ्या सोसायट्यांना केडीएमसीच्या वतीने मालमत्ता करात सूट देण्यासह इतरही फायदे देण्याचा विचार सुरू असल्याचेही आयुक्त अभिनव गोयल यांनी स्पष्ट केले.

तर "नागरिकांच्या छोट्या-छोट्या सवयींमुळे शहरात मोठा बदल घडवून आणता येतो. प्रशासन म्हणून आम्ही आमची जबाबदारी ओळखून या 7 मुद्द्यांवर गांभिर्याने कार्यवाही सुरू केली असून गृहसंकुलांनीही आता त्यांची सामाजिक जबाबदारी पार पाडण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी उपस्थित नागरिकांना केले. दरम्यान केडीएमसी प्रशासनाने पुढाकार घेऊन आयोजित केलेल्या या उपक्रमाचे उपस्थित गृहसंकुलांच्या पदाधिकाऱ्यांनी टाळ्यांच्या कडकडाटात स्वागत केले. तसेच गेल्या 6 महिन्यांपासून केडीएमसी आयुक्त अभिनव गोयल यांच्यामार्फत शहर सौंदर्यीकरणासाठी घेण्यात येणाऱ्या प्रयत्नांचेही विशेष कौतुक केले.



**शाश्वत आणि सुरक्षित शहर विषयावर आयोजित चर्चासत्राला गृहसंकुलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद**

# आमदार सुलभा गायकवाड यांच्या हस्ते विकासकामांची भूमिपूजने

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण पूर्वचे माजी आमदार गणपत गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली आणि विद्यमान आमदार सुलभा गायकवाड यांच्या तर्फे सन २०२४-२५ च्या आमदार निधीतून २ कोटी १ लाख रुपयांच्या विविध विकासकामांचा भूमिपूजन सोहळा शुक्रवारी संपन्न झाला.

या निधीतून कल्याण - डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील प्रभाग. ९७ शनिनगर प्रभागातील हनुमान नगर ते न्यु संजय अपार्टमेंट येथे गटार बनविणे, शनिनगर प्रभागातील ओम मार्लेश्वर सोसायटी ते अनिता अपार्टमेंट पर्यंत आर सी सी गटार बनविणे, शनिनगर प्रभागातील हिरा अपार्टमेंट ते माँ संतोषी कोम्पलेक्स मागील रस्ता कॉंक्रिटीकरण करणे. शनिनगर प्रभागातील भागाबाई चाळ ते पांडुरंग नगर पर्यंत आर. सी. सी. गटर बनवून बंदिस्त करणे. शनिनगर प्रभागातील पुनम अपार्टमेंट ते बाळु पावशे चाळी पर्यंत आर.सी.सी. गटर बनविणे व बंदिस्त करणे. शनिनगर प्रभागातील हनुमान नगर मुख्य रस्ता ते नक्षत्र अपार्टमेंट पर्यंत रस्ता क्रॉक्रिटीकरण करणे.



कल्याण - डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील प्रभाग. १०२. भगवान नगर प्रभागातील पावशे चाळ परिसरात पायवाट व आर.सी.सी. गटार बनविणे. प्रभाग. १०३, कैलासनगर - साईनगर मध्ये जनसेवा मित्र मंडळ परिसरात सी.सी. रस्ता तयार करणे, कैलासनगर साईनगर परिसरातील भारती चाळ ते दुर्गा कॉलनी पर्यंत (जनसेवा) रस्ता क्रॉक्रीटीकरण करणे. साईनगर-कैलासनगर परिसरातील साईराज कॉलनी ते विनायक कॉलनी ब्रिज (कमलादेवी कॉलेज) पर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. प्रभाग १०२. भगवान नगर मधील जय प्रभुकुंज सोसायटी हनुमाननगर परिसरात सी. सी. गटार व पायवाट बनविणे. अशी नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित कामे हाती घेण्यात आली आहेत.

या सर्व विकासकामांचा भूमिपूजन सोहळा आमदार सुलभा गायकवाड यांच्याहस्ते पार पडला. ही कामे म्हणजे केवळ विकास नव्हे, तर नागरिकांना दिलेल्या वचनांची पूर्तता आणि समाजसेवेचा ठोस पुरावा आहेत. जनतेच्या विश्वासाला उतराई होणं, हेच आमचं ध्येय असल्याची प्रतिक्रिया यावेळी आमदार सुलभा गायकवाड यांनी दिली. या प्रसंगी माजी नगरसेवक मनोज राय, हेमलता पावशे, अमृता जाधव,अनंता पावशे, मंडळ अध्यक्ष संतोष शेलार, यशोदा माळी,चंद्रशेखर म्हात्रे,राकेश देशमुख,सौरभ सिंग, मोना शेठ, वंदना मोरे, सत्यप्रकाश उपाध्याय, राजेश अंकुश, संदीप जाधव, उल्हास खरात तसेच स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि रहिवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**कल्याण पूर्वेत वचनपूर्तीचा आणखी एक टप्पा पूर्ण**








# शिक्षक संघटनेचा जिल्हाधिकारी कार्यालयावर मूक मोर्चा

## टीईटी संदर्भात राज्य शासना विरोधात शिक्षकांचा संताप

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : राज्यातील पहिली ते आठवीच्या वर्गांना शिकवणाऱ्या शासकीय व खाजगी मान्यता प्राप्त शिक्षकांना सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार शिक्षक पात्रता परीक्षा (TET) पूर्वलक्षी प्रभावाने अनिवार्य करण्यात आली आहे. राज्य शासनाने या निर्णयाविरोधात पुनर्विचार याचिका दाखल न केल्यामुळे अनेक प्रामाणिक शिक्षकांवर अन्याय झाला आहे. उत्तर प्रदेश सरकारने या निर्णयाविरोधात पुनर्विचार याचिका दाखल केली असून त्या धर्तीवर महाराष्ट्र शासनानेही पुनर्विचार याचिका दाखल करावी तसेच नियमाने सेवेत रुजू झालेल्या शिक्षकांना TET मधून सूट देण्यात यावी या मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक मध्यवर्ती संघटनेच्या वतीने रविवार दिनांक 09 नोव्हेंबर 2025 दुपारी 12.00 ते 2.00 वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे येथे मुक मोर्चाचे आयोजन केले आहे. या मूक मोर्चासाठी महाराष्ट्र राज्य शिवछत्रपती शिक्षक संघटनेने पाठिंबा दिला असून शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे हे यावेळी उपस्थित राहणार आहेत.

राज्यातील शिक्षक संघटनांनी यापूर्वी 1 ऑक्टोबर 2025 रोजी नागपूर येथे झालेल्या बैठकीत शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्याशी चर्चा करून शासन लवकरच सर्वोच्च न्यायालयात पुनर्विचार याचिका दाखल करेल अशी ग्वाही मिळाल्याने दि.4 ऑक्टोबर 25 रोजी नियोजित मूक मोर्चा स्थगित केला होता. मात्र शासनाने ठरलेल्या मुदतीत पुनर्विचार याचिका दाखल न केल्याने शिक्षक वर्गामध्ये संतापाची लाट उसळली आहे.

या मूक मोर्चातून टीईटी संदर्भात तातडीने सर्वोच्च न्यायालयात पुनर्विचार याचिका दाखल करावी. 15 मार्च 2024 चा सुधारित संच मान्यता शासन निर्णय रद्द करावा, जुनी पेन्शन लागू करावी, सर्व ऑनलाईन कामे रद्द करावी, विषय शिक्षकांना पदवीधर वेतनश्रेणी लागू करावी, शिक्षण सेवक योजना रद्द करावी, वस्ती शाळा शिक्षकांची मूळ सेवा सेवा कालावधीसाठी ग्राह्य धरावे अशा प्रमुख मागण्या मांडल्या जाणार आहेत. राज्य शासनाने शिक्षकांच्या भावना लक्षात घेऊन तातडीने सकारात्मक निर्णय घेतला नाही तर पुढील काळात आंदोलन तीव्र केले जाईल असा इशारा महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक मध्यवर्ती संघटनेचे राज्य अध्यक्ष केशवराव जाधव व राज्य सरचिटणीस राजेश सुर्वे यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

तरी सर्व शिक्षक बांधवांनी या मोर्चात मोठ्या संख्येने उपस्थित राहून लोकशाही मार्गाने आपल्या न्याय्य हक्कासाठीचा आवाज बुलंद करावा असे आवाहन महाराष्ट्र राज्य शिवछत्रपती शिक्षक संघटनेचे प्रांताध्यक्ष प्रशांत भामरे, ठाणे जिल्हा ग्रामीण जिल्हाध्यक्ष धनाजी तुकाराम दळवी व ठाणे जिल्हा शहरी वसंत जोहरे यांनी केले आहे.

# आपत्ती व्यवस्थापन काळाची गरज

**गिरीधर पिंगळे गुरुजी**
**गोरठण बुद्रुक खालापूर**
**मोबाईल : 9823779606**

फार जुन्या काळी आपल्या गरजा माफक होत्या साधेसेच घर ,पाण्यासाठी विहीर, घराबाहेर अंघोळीसाठी नहाणी, घरात उजेडासाठी कंदील देवापुढे व तुळशी पुढे एक पणती बस एवढीच प्रकाशाची साधने होती. त्यावेळी करमणुकीसाठी टीव्ही नव्हता ,मोबाईल नव्हता, सिनेमा नव्हता फक्त एकच करमणुकीची साधन म्हणजेच रेडिओ. तसेच भजन कीर्तन हे भक्ती भावाचे साधन. त्या वेळचे सर्व जेवण चुलीवरच व्हायचे ते चविष्ट ही असायचे. जेवणात मांस ,मच्छी असायची, शाकाहारी डाळ, भाजी बस्स साध्या पद्धतीने व्हायचे कधी भाकरी व भातावरच भागवायचे. मर्यादित साधन सुविधेने मानव सुखी व समाधानी होता.

काळ बदलला गरजा बदलल्या. गरजांचा पाढा किती वाचला तर पानेच्या पाने रंगतील. गावाचे शहरीकरण झाले साध्या झोपडी ऐवजी टोलेजंग इमारती शहराची साक्ष देत होत्या. टोलेजंग इमारतींना लिफ्ट आली. ब्लॉक मध्ये संडास व बाथरूम आला. पाणी तापवण्यासाठी गिझर आला. घरातील वायर कन्सिल झाली. ब्लॉक मधील सर्व खोल्यात विजेच्या दिव्यांची जणू रोजच दिवाळी असते. त्यासाठी एका समारंभाची गरज नाही. मोठ मोठाले कारखाने उभे राहिले त्यांचे धूर सोडणारे धुरांडे आग ओकतात. त्यांना लागणारी प्रचंड वीज प्रवाह व त्याची जोडणी व यंत्रांची किचकट जोडणी शिवाय कंपनी भोवती उजळणाऱ्या दिव्यांची नैमित्तिक रोषणाई अशा कितीतरी बदलाची उदाहरणे देता येतील. अशा गरजांची यादी संपणार नाही.

आपण गरजा वाढवत असताना त्यांचा दूरगाम काय परिणाम होईल याची कधी कल्पनाच करत नाहीत. जशा सुधारणा होत जातात तशा आपत्तीही त्याला लागूनच येतात आपण त्या आपत्तीकडे कानाडोळा करतो. आज आपण आपत्ती व्यवस्थापन काळाची गरज का आहे याचा विचार करणार आहोत. आपत्ती म्हणजे संकट. संकटे काही सांगून येत नाहीत आपत्तीचे दोन प्रकार पडतात एक नैसर्गिक आपत्ती आणि दुसरी मानवनिर्मित आपत्ती. निसर्गाची आपत्ती परवडते कारण त्याच्यावर आपले नियंत्रण नसते परंतु मानवनिर्मित आपत्ती ही फार महाभयानक असते याबाबत जगाचा विचार करण्याऐवजी आपल्या घरापासूनच सुरुवात करूया.

आपल्याला जी गोष्ट साधी वाटते ती गोष्ट साधी नसते आपल्या घरात आपण विजेचा वापर करतो परंतु विजेच्या भयानकतेची आपल्याला कल्पना नसते. साधी म्हणून विजेला आपण गृहीत धरतो. कमी खर्चात व्हावी म्हणून वीज जोडणी थातूरमातूर करून चालणार नाही मोठमोठाली वीज जोडणीची कामे केवळ पैसा कसा मिळेल असा ठेकेदार विचार करतात. विजेचा शॉर्ट सर्किट होऊन घर अथवा एखादा कारखाना जळून खाक होते. अशीच बरीच उदाहरणे गावातील व शहरातील इमारतीला आग लागल्याची आहेत. यामध्ये माणसाचा हलगर्जीपणाच दिसून येतो. गॅसवर जेवण बनवताना गॅस चालू असताना गृहिणी टीव्ही चॅनलवर स्टोरी पाहताना गॅस चालू आहे याची जाणीव नसते तसेच घरातील विघ्न संतोषी माणूस मनात वाईट विचार करून गॅस चालू करतो. या दोन्ही वेळी गॅसचा स्फोट होऊ शकतो आता बोला याला काय म्हणावे? यासाठी दोन ओळी

**दुर्लक्ष क्षणाचा घात सर्वस्वाचा**
**द्वेषाचा राक्षस कारण नाशाचा**

घरात देवापुढे तुम्ही दिवा लावता ना? नक्कीच लावत असणार दिवा म्हणजे विजेचा दिवा नाही तर तेलाचा दिवा बरोबर ना. मग रात्री झोपताना हा दिवा माळवीला पाहिजे अथवा तो दिवा काचेचे संरक्षण भांडे मिळते त्याचा वापर करावा. दिवा मोकळा असल्यास रात्री उंदीर येऊन पेटती वात पळवली तर घरातील कापडावर अथवा बिछान्यावर पडल्यास आग लागू शकते. याबाबत श्री छत्रपती शिवाजी महाराजांनी सुद्धा आपल्या कर्मचाऱ्यांना खलिता लिहिला होता त्यात महाराज लिहितात" रात्री तेलाचे दिवे चालू असतील त्यांची वात उंदीर पळवतील व ती वात कडब्याच्या गंजीत पडली तर संपूर्ण गंजी जळून खाक होईल. घोड्यांना वैरण मिळणार नाही. त्यावेळी ही महाराजांनी केवढी दूरदृष्टी! महाराज आपणास कळणार कधी ?

लांबच उदाहरण कशाला रायगड जिल्ह्यातील चौक जवळील ईशाळ वाडीवर जो काळाचा घाला झाला.ही नैसर्गिक आपत्ती होती वाडीवर जी आपत्ती आली त्यावेळी त्यांच्यासाठी शासनाने सर्वतोपरी मदत केली त्यांची तात्पुरती व्यवस्था केली तसेच कायमस्वरूपी नवीन ठिकाणी गाव वसवले त्या आपत्तीमुळे शासनासमोर एक मुद्दा आला जी जी गावे डोंगराखाली आहेत त्यांचे स्थलांतरित करण्याची गरज आहे पण जोपर्यंत आपत्ती येत नाही तोपर्यंत ते गाव हलविण्यास तयार होत नाही. बघू काय होते ते ?

आपण पाहतो टीव्ही व हवामान खात्याने सांगितले की बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा निर्माण होणार आहे त्यामुळे चक्रीवादळ भारताच्या किनाऱ्यावर धडकणार आहे. अशावेळी आपले सरकार त्या किनाऱ्यावरील लोकांना सुरक्षित ठिकाणी हलवते अशा प्रकारची कार्यवाही सन 2023मध्ये आपल्या सरकारने करून दोन तीन लाख लोकांना सुरक्षित स्थळी हरवले होते. त्या जागी लष्कर व निमलष्करी तुकड्या तैनात केल्या होत्या.

नैसर्गिक आपत्ती कधीकधी सांगून येत नाही. अशावेळी ते आपण थोपवू शकत नाही. मानवनिर्मित आपत्ती आपण टाळू शकतो. एखाद्याचा राग धरून घराला, शेतातील मळणीला, संपूर्ण बागेला, कडब्याच्या गंजीला व कारखान्याला आग लावली जाते.अशा घटना आपणास चित्रपटात सर्रास पाहावयास मिळतात याला काय म्हणावे? आधुनिक योग एवढ्यावरच थांबत नाही. हे अनुयुग आहे. काही राक्षसी माणसे संपूर्ण जगाला वेठीला धरत आहेत. म्हणतात ना "मन चिंती ते वैरी न चिंती "याबाबत बहिणाबाई म्हणतात

**"मन जहरी जहरी**
**त्याचं न्यार र तंतर**
**विंचू साप बरा**
**त्याले उतारी मंतर**

मानवनिर्मित आपत्ती टाळण्यासाठी आपण शिक्षणाने आजच्या नव्या पिढीवर योग्य ते संस्कार करणे गरजेचे आहे. मानव शिक्षित असून भागत नाही तो सुसंस्कृत असणे आवश्यक आहे. माणूस सुसंस्कृत होईल तो दिन नक्की सोनियाचा होईल! अशा अनेक प्रकारच्या आपत्ती येतात व येणार आहेत. रोग झाला त्यापेक्षा रोग होणारच नाही याची काळजी घ्यावी. नैसर्गिक आपत्तीवर आपण मात करू शकणार नाहीत; तरी मानवी आपत्तीवर आपण मात करू शकलो यापेक्षा आनंदाची गोष्टी ती कोणती? आपत्ती अनेक व त्याचे व्यवस्थापन करणे आपले कर्तव्य आहे यासाठी चार ओळी

**आपत्तीची नको चिंता**
**कसा सोडवावा हा गुंता!**
**निसर्गाची निगा करू**
**मनाची मशागत करू**

जय हिंद जय महाराष्ट्र

# उथळसर आणि नौपाडा भागात सोमवारी पाणी पुरवठा बंद

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील उथळसर प्रभाग समिती अंतर्गत सिध्देश्वर जलकुंभ येथे नवीन जलकुंभाचे काम सुरू करण्यात आले आहे. या कामामुळे कोलबाड परिसरात पाणी पुरवठा करणारी मुख्य पाणी पुरवठा वाहिनी बाधित होत असल्याने ही जलवाहिनी स्थलांतरीत करणे आवश्यक आहे. या ६०० मिमी व्यासाच्या जलवाहिनी स्थलांतराचे काम सोमवार दि. १० नोव्हेंबर, २०२५ रोजी करण्यात येणार आहे. त्यामुळे, सोमवार दि. १० नोव्हेंबर, २०२५ रोजी स. ९.०० ते मंगळवार दि. ११ नोव्हेंबर, २०२५ रोजी सकाळी ९.०० वाजेपर्यंत असे एकूण २४ तास या जलवाहिनीवरील पाणी पुरवठा बंद ठेवण्यात येणार आहे.

या शटडाऊन कालावधीत उथळसर प्रभाग समितीमधील सिध्देश्वर तलाव परिसर, माता रमाबाई आंबेडकर नगर, गणेश वाडी, नितीन कंपनी, पाचपाखाडी, हंस नगर, सिंग नगर, खोपट, फ्लॉवर व्हॅली, शेलार पाडा, गोकुळदास वाडी, कोलबाड, गोकुळ नगर परिसर व नौपाडा प्रभाग क्षेत्रातील पाचपाखाडी, चंदनवाडी, महापालिका मुख्यालय परिसर, चरई, धोबीआळी इ. भागात २४ तासासाठी पाणी पुरवठा पूर्णपणे बंद राहील. मंगळवार, ११ नोव्हेंबर, २०२५ रोजी पुरवठा सुरू झाल्यानंतर पुढील १ ते २ दिवस कमी दाबाने पाणी पुरवठा होईल, याची कृपया नागरीकांनी नोंद घ्यावी. या पाणी कपातीच्या कालावधीत पाण्याचा काटकसरीने वापर करून सहकार्य करावे, असे आवाहन ठाणे महानगरपालिकेने केले आहे.

# स्काऊट-गाईड स्थापना दिन उत्साहात साजरा



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : "कर्तव्य, शिस्त आणि सेवा हाच स्काऊट-गाईडचा खरा मंत्र आहे" या संदेशाने दुमदुमलेल्या वातावरणात भारत स्काऊट आणि गाईड ठाणे जिल्हा कार्यालयात स्काऊट-गाईड स्थापना दिन दिनांक ७ नोव्हेंबर २०२५ रोजी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमात संघटनेच्या मूल्यांची उजळणी करत युवकांमध्ये नेतृत्वगुण, शिस्त, सेवा आणि समाजाप्रती बांधिलकी यांचे महत्व अधोरेखित करण्यात आले. यावेळी राज्य चिटणीस सारिका बांगडकर, राज्य प्रशिक्षण आयुक्त शुभांगी तेंडोलकर आणि राज्य संघटन आयुक्त सीमा चाळके या मान्यवरांनी उपस्थित राहून स्काऊट-गाईड चळवळीचे उद्दिष्ट, कार्यपद्धती आणि समाजातील भूमिका याबाबत मार्गदर्शन केले. त्यांनी युवकांच्या सर्वांगीण विकासात व राष्ट्रनिर्मितीत स्काऊट-गाईड चळवळीचे योगदान किती महत्त्वाचे आहे, यावर प्रेरणादायी भाष्य केले.

कार्यक्रमास जिल्हा संघटक हेमांगी पाटील, राहुल सूर्यवंशी, वरिष्ठ लिपिक संदीप घुसिंगे, कनिष्ठ लिपिक वनिता ससाणे, चौकशी अधिकारी धर्मराज काळे, नाईक विठ्ठल शिरोसे आणि शिपाई शिवाजी पार्टे हे उपस्थित होते. उपस्थित सर्व मान्यवरांना ध्वज स्टिकर प्रदान करून सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा संघटक हेमांगी पाटील यांनी केले.

# जितेश घाटवळ यांच्याकडून खवली विद्यालयाला म्युझिक सिस्टिम भेट

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**



**पेण** : सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमिक विद्यालय खवली येथील विद्यालयाला 21 हजार रुपयांचे म्युझिक सिस्टीम गावातील प्रतिष्ठित जितेश घाटवळ यांनी आपला मुलगा अद्विक याच्या तिस-या वाढदिवसानिमित्त विद्यालयाचे मुख्याध्यापक मोरे एम. व्ही. यांना आज विद्यालयात येऊन भेट दिली. सोबत विद्यालयाच्या 300 विद्यार्थ्यांना अल्पोपहार सुद्धा देण्यात आला. याप्रसंगी विद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेतर स्टाफ उपस्थित होता विद्यालयाचे शिक्षकेतर कर्मचारी शरद गडगे व व माई यांनी विशेष प्रयत्न केले आणि विद्यालयाला ही भेट वस्तू मिळवून दिली सर्व मान्यवरांचे विद्यालयाचे जेष्ठ शिक्षक विलास डुबे, चव्हाण सर, शेखर , डोखे सर , दिघे सर सौ दीक्षा पवार सौ दंत मॅडम समीर पाटील श्री देवरे सर या सर्वांनी घाटवळ परिवाराचे. आभार मानले.

### जिल्हा परिषद शाळा कांदळी येथे

# विद्यार्थी दिवस उत्साहात साजरा




**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**शहापूर ग्रामीण** : वाशिंद जवळील जिल्हा परिषद शाळा कांदळी येथे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचा शाळा प्रवेश दिन विद्यार्थी दिवस म्हणून साजरा करण्यात आला.

विश्वरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला विद्यार्थ्यांचे हस्ते पुष्पहार अर्पण करून व दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. तसेच सर्व विद्यार्थ्यांनी पुष्प अर्पण करून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले.

शाळेचे सहशिक्षक अशोक गायकवाड यांनी 7 नोव्हेंबर विद्यार्थी दिन का साजरा करण्यात येतो या विषयावर प्रबोधन पर मार्गदर्शन केले. तर विद्यार्थी दिवस या विषयावर सर्व विद्यार्थ्यांनी आपली मनोगते (भाषणे ) सादर केली. तसेच विद्यार्थ्यांच्या निबंध स्पर्धा घेण्यात आल्या व नांदणं नांदणं होतं रमाचं नांदणं या गाण्यावर इयत्ता दुसरी व तिसरीच्या विद्यार्थिनींनी सुंदर नृत्य सादर केले. यावेळी ग्रामस्थ व माजी विद्यार्थी उपस्थित होते.

# तोतया मनपा अधिकाऱ्याला अटक

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**नवी मुंबई** : घराचे नूतनीकरण बेकायदा असल्याचे सांगत दंडापोटी लाखो रुपये उकळणाऱ्या तोतया मनपा अधिकाऱ्याला वाशी पोलिसांनी अटक केली. त्याच्या विरोधात यापूर्वीही दोन गुन्हे दाखल आहेत.
संदीप तावडे उर्फ अमोल पिसके असे त्याचे नाव आहे. नवी मुंबईत मनपा अधिकारी असल्याची थाप मारून दंडात्मक कारवाईची धमकी देत तो खंडणी उकळत होता. गेल्या अनेक महिन्यापासून त्याच्या विरोधात पालिकेकडे तक्रारी येत होत्या.यासंबंधी डॉ. अमृत हंचारे यांनी वाशी विभाग अधिकारी सुखदेव वेडवे यांच्या मार्गदर्शखाली तक्रार दाखल केली. मनपा अधिकारी असल्याचे सांगत अमोल पिसके त्यांच्याकडे आला होता. त्यांच्या सदनिकेचे नूतनीकरण बेकायदा असल्याचे सांगत दीड लाख रुपये दंड ठोठावण्याची धमकी त्याने दिली. वाशी पोलिसांनी सापळा रचून त्याला ताब्यात घेतले.

### डोंबिवलीत माणकोली पुलावर

# बाइकस्वारांची रीलसाठी स्टंटबाजी

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**डोंबिवली** : पश्चिमेकडील मोठागाव-माणकोली उड्डाणपुलावर बाइकस्वारांची रील बनविण्यासाठी जीवघेणी स्टंटबाजी सुरू आहे. एकीकडे हा उड्डाणपूल मद्यपींसाठी अड्डा बनला असताना आता बाइकस्वारांच्या स्टंटबाजीमुळे अन्य वाहनांसाठी या मार्गावरील प्रवास धोक्याचा झाला आहे.

माणकोली उड्डाणपूल डोंबिवली-ठाणे-नाशिक मार्गावरील एक महत्त्वाचा पूल आहे. या चारपदरी पुलामुळे ठाणे ते डोंबिवली दरम्यानचा प्रवास सोपा आणि जवळचा झाला आहे. हा उड्डाणपूल प्रवासासाठी महत्वपूर्ण असताना रात्रीच्या सुमारास या ठिकाणी मद्यपी बिनदिक्कत पेले रिचवत असून, प्रेमी युगुलांचे अश्लील चाळेही सुरू असतात.



आता तर रील बनविणाऱ्यांसाठी हा उड्डाणपूल सोयीचा झाला असून, भरधाव वेगाने दुचाकी चालवून रीलसाठी जीवघेणी केली जाणारी स्टंटबाजी इतर वाहनचालकांच्या जिवावर बेतण्याची शक्यता नाकारता येत नाही. पोलिस आणि वाहतूक विभागाने उड्डाणपुलावर धुडगूस घालणाऱ्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी होत आहे.

**वाहनचालकांसाठी प्रवास झाला धोक्याचा**

**एकीकडे हा उड्डाणपूल मद्यपींसाठी अड्डा बनला असताना आता बाइकस्वारांच्या स्टंटबाजीमुळे अन्य वाहनांसाठी या मार्गावरील प्रवास धोक्याचा झाला आहे.**



## आजचे राशि भविष्य

**मेष**
आध्यात्मिक क्षेत्रात काम करणाऱ्यांना मनाची एकाग्रता साधता येईल. आध्यात्मिक चेतना मिळेल. मुलांकडून सुखद बातमी कळेल.

**वृषभ**
स्वप्ने पूर्ण होतील. अविवाहितांसाठी लग्नाचे प्रस्ताव. लांबलेल्या प्रकरणात यश. यश मिळेल. मतभेदांपासून लांब रहा.

**मिथुन**
अनुकूलतेमुळे मन प्रसन्न राहील. कार्यक्षेत्राचा विकास आणि विस्तार होईल.अभीष्ट सिद्धी होईल. फायदा होईल. विरोधक करार करतील.

**कर्क**
भागीदारीतून विशेष लाभ. उपजीविकेच्या स्त्रोतातून लाभ होईल, लोकप्रियतेत वृद्धि होईल. रोग, ऋण संबंधी कार्यात विशेष लाभ.

**सिंह**
कामात यश सुनिश्चित. कामाची गति बाधित होऊ शकते. सामाजिक क्षेत्रात, ज्ञानवर्धक कामांमध्ये हजेरी द्यावी लागेल.

**कन्या**
व्यापार राहील. विवाह योग, घरात शुभ मांगलिक कार्ये. व्यापारिक भागीदारीसाठी उत्तम वेळ. अधिकारांचा योग्य वापर करा.

**तूळ**
व्यापारात बुद्धिमत्ता, दूरदर्शितेची प्रशंसा होईल. अत्यधिक प्रयत्नांचा अल्प लाभ मिळेल. तणाव अडचणी राहतील.भागीदारी पक्षात होऊ शकते.

**वृश्चिक**
उत्तम वाहन सुख. तब्बेतीत सुधारणा. धार्मिक कार्यात वेळ जाईल.कोणतेही काम एखाद्यावर विसंबून राहून करू नका. आरोग्य नरम-गरम राहील.

**धनु**
आत्मविश्वास हीच यशाची गुरुकिल्ली असते. चांगल्या घटना घडतील.कौटुंबिक सुख लाभेल. आलेली संधी न गमावणे हे तुमच्या यशाचे रहस्य.

**मकर**
स्पर्धा, पैज जिंकू शकाल. लाभ होईल.मनावरील दडपण दूर. अनुसंधानातून कार्यक्षेत्रात प्राप्ति योग. धर्म, आध्यात्मात रूचि वाढेल.

**कुंभ**
अर्थप्राप्ती झाल्याने खर्चाचे प्रश्न सुटतील. अध्ययनात छान यश. अर्थ प्राप्तिचा योग. परिश्रमाने कामाचे शुभ परिणाम येतील.

**मीन**
मनाला प्रसन्नता वाटेल. वैवाहिक जीवनात सुख मिळेल. मित्रांकडून आर्थिक लाभ होईल. आनंदाची बातमी मिळेल. पाठबळ मिळेल.

जीवनदीप महाविद्यालय गोवेली ता. कल्याण
मुंबई विद्यापीठाशी संलग्न, नॅक मूल्यांकन प्राप्त
प्रवेश सुरू (२०२५•२६)
पदवी नंतर पत्रकारितेत करिअर करण्याची सुवर्णसंधी
एम.ए (एमसीजे)
(मास्टर ऑफ जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन)
-पात्रता-
कोणत्या शाखेतून पदवी उत्तीर्ण
- करिअर व्यवसाय व नोकरीची संधी -
टीव्ही चॅनेल्स, वृत्तपत्र, मॅक्झिन, रेडिओ, वेब मीडिया, जनसंपर्क, जाहिरात, चित्रपट निर्मिती, डिजिटल मीडिया या क्षेत्रांमध्ये संधी .
- प्रवेशासाठी संपर्क -
९४२१०५९३९६
goveli_jssp@rediffmail.com
www.jeevandeepcollegegoveli.in



नियमित वाचा दैं. ठाणे जीवनदीप वार्ता

## प्रोजेक्ट महादेवा ठाणे जिल्हा निवड चाचण्या

**प्रचंड उत्साह आणि फुटबॉल प्रतिभेचा आविष्कार**

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** महाराष्ट्र शासन क्रीडा विभाग, महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्र), सिडको आणि वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशन (WIFA) यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यात फुटबॉल खेळाचा विकास, प्रचार आणि प्रसार करण्याच्या उद्देशाने “महादेवा” ही महत्त्वाकांक्षी योजना राबविण्यात येत आहे. या योजनेच्या माध्यमातून राज्यातील युवा खेळाडूना फुटबॉलमध्ये करिअर करण्याच्या दृष्टीने प्रोत्साहन देणे हे प्रमुख उद्दिष्ट आहे. या योजनेचा एक भाग म्हणून, राज्यातील 13 वर्षांखालील मुले व मुलीसाठी जिल्हा, विभाग आणि राज्य स्तरावर फुटबॉल निवड चाचण्यांचे आयोजन करण्यात येत आहे. ठाणे जिल्ह्यातील खेळाडूंची निवड चाचणी दि.01 नोव्हेंबर 2025 रोजी मुले व 02 नोव्हेंबर 2025 रोजी मुली श्री. यशवंतराव चव्हाण फुटबॉल मैदान, सेक्टर 19, नेरूळ, नवी मुंबई येथील क्रीडांगणात यशस्वीपणे आयोजित करण्यात आली. ही चाचणी जिल्हा क्रीडा अधिकारी (DSO) कार्यालय, ठाणे आणि ठाणे फुटबॉल असोसिएशन (TFA) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली होती. दोन दिवस चाललेल्या या निवड चाचण्यांमध्ये ठाणे जिल्ह्यातील तरुण फुटबॉलपटूंनी दाखविलेला सहभाग, शिस्त आणि उत्साह पाहता ठाणे जिल्ह्यातील फुटबॉल संस्कृती व तरुण प्रतिभा विकासाबाबतची बांधिलकी अधोरेखित झाली.

या निवड प्रक्रियेत पहिल्या दिवशी 355 मुले आणि दुसऱ्या दिवशी 64 मुली अशा एकूण 419 खेळाडूंनी सहभाग घेतला. काटेकोर निवड प्रक्रियेनंतर 20 मुले व 20 मुलींची ठाणे जिल्ह्याच्यावतीने पुढील विभागीय फेरीसाठी निवड करण्यात आली. विभागीय व त्यानंतर राज्य स्तरावर निवड होणाऱ्या खेळाडूंना दि.14 डिसेबर,2025 रोजी मुंबई येथे जागतिक कीर्तीचे फुटबॉलपटू “लिओनेल मेस्सी” यांच्यासोबत खेळण्याची एक अभूतपूर्व संधी मिळणार आहे.

या कार्यक्रमाचे मार्गदर्शन आणि देखरेख खालील मान्यवरांनी केले :

ठाणे फुटबॉल असोसिएशन सचिव सुनील पुजारी, जिल्हा क्रीडा अधिकारी, ठाणे सुवर्णा बारटक्के, क्रीडा अधिकारी, ठाणे सिद्धार्थ वाघमारे, ठाणे फुटबॉल असोसिएशन सहसचिव अमजद खान, मैच कमिशनर, WIFA शीतल रसालम.

WIFA नियुक्त स्काउट्स हेमंत पावळे, सुप्रित जेठाणा, सम्राट राणा आणि श्रुतिलक्ष्मी व्ही.के.यांनी खेळाडूची तांत्रिक, रणनीती व शारीरिक निकषावर काटेकोर तपासणी केली.

**ठाणे जिल्हा अंतिम निवड यादी**

**अंडर - 13 मुले (जन्म 2012 च 2013) :-** आर्यव्रत आशिष सरस्वत, निहार विकास नांबियार, आर्य राममूर्ती नायडू, दैविक कमलेश गलानी, रणवीर सिंह चावला, आरव चंद्रकांत सोनवणे, मल्हार लक्ष्मीकांत सावंत, अनय अमित भुसकुटे, तनिष चंद्रशेखर मल्लि, आर्यन संतोष पिंगळे, लक्ष्य नरेश मळकर, गिरीश मेनन, एफ्रॉन अँग्रेलो डिसा, कनिष्क संजय मिश्रा, निहार कृष्ण एस, तनय रंजीत, शीहान बॅनर्जी, विहान नागधर बांदी, स्वरित संजय सातपुते व हर्षित नरेंद्र निकम.

**अंडर - 13 मुली (जन्म 2012 व 2013) :-** स्वयमप्रभा महाराणा, जीविका राजपूत, निहारिका सुरेश, हना खान, स्वर विक्रम कुदळे, नव्या पाटील, जीविका रुपेजा, कृतिका राय, दुर्वा तर्मळे, रेबेका सिबी, समायरा सिग, कियाराह अनिरुद्ध सराफ, मन्नत धीरज आहुजा, अक्षरा आदर्श शेट्टी, आश्मी आदर्श शेट्टी, आरझू विकास कदम, लावण्य रविंद्र ठाकरे, अनु मेघा रूपेश, त्रयी प्रभाष शेट्टी व फाटक इराम शमशुद्दीन. “प्रोजेक्ट महादेवा” हा उपक्रम महाराष्ट्रभरातील तरुण फुटबॉल प्रतिमा शोधण्यासाठी आणि त्यांना योग्य प्रशिक्षण देण्यासाठी एक महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरत आहे. ठाणे जिल्ह्यातील या निवड चाचण्यांनी पुन्हा एकदा सिद्ध केले की, ठाणे जिल्ह्यातील फुटबॉलची पायाभरणी मजबूत असून भविष्यात अनेक उत्कृष्ट खेळाडू राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर ठसा उमटवत्तील, असे ठाणे जिल्हा क्रीडा अधिकारी सुवर्णा बारटक्के यांनी कळविले आहे.

### सम्यक विद्यार्थी आंदोलन आणि वंचित बहुजन आघाडीच्यावतीने
# नागरी समस्यांबाबत केडीएमसी आयुक्तांना निवेदन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** सम्यक विद्यार्थी आंदोलन आणि वंचित बहुजन आघाडीच्या यांच्या संयुक्त नागरिकांच्या विविध समस्यांबाबत कल्याण डोंबिवली महानगर पालिका आयुक्त डॉ अभिनव गोयल यांना शुक्रवारी निवेदन देण्यात आले. कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने कोणताही विकास मागील दहा वर्षात केला नाही, पण कर वसुलीसाठी ज्यांनी कर भरला नाही त्यांची घरे जप्त करण्याचा जो निर्णय घेण्यात आला आहे. तो निर्णय त्वरिव मागे घेण्यात यावा अन्यथा महानगर पालिके विरोधात आंदोलन करण्यात येणार असा इशारा देण्यात आला. यावेळी सम्यक विद्यार्थी आंदोलन राज्य प्रवक्ते प्रतिक साबळे, वंचित बहुजन महिला आघाडी माजी महासचिव रेखा कुरवारे, कल्याण पूर्व वंचित बहुजन आघाडी युवा अध्यक्ष प्रकाश घोडगे उपस्थित होते.

मागील दहा वर्षांमध्ये कल्याण डोंबिवलीचा कोणताही विकास झालेला नसताना देखील महानगर पालिकेने लोकांनी कर भरणा न केल्यामुळे घर जप्तीचे आदेश



काढण्यात आले आहे तो आदेश त्वरित मागे घेण्यात यावा आणि तसा जीआर प्रसिद्ध करावा. महानगरपालिकेतील 27 गावांचा महानगरपालिकेत समावेश झाल्यापासून मागील दहा वर्षात कोणताही विकास करण्यात आला नाही परंतु या 27 गावांना दहा पट अतिरिक्त कर लादण्यात आला होता तो कर आता कमी करण्यात आला आहे. परंतु तो कर भरण्यासाठी 27 गावांना देण्यात आली नाही ती मुभा या 27 गावांना देण्यात यावी. तसेच ज्या प्रकारे मागील चार-पाच वर्ष महानगरपालिकेने अभय योजना लागू केली होती ती अभय योजना या 27 गावांसाठी पुढील दहा वर्षे लावण्यात यावी जेणेकरून 27 गावांवरील कर लोकांना भरण्यास सवलत मिळेल.

महानगरपालिकेच्या हद्दीतील सर्व जिल्हा परिषद शाळांच्या आवारात आणि वर्गांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात यावे.

कल्याण शीळ मार्गावर मानपाडा ते लोढा या परिसरात महानगरपालिकेचे नवीन 200 खाटांचे सर्व सोयी सुविधांनी सुसज्ज असे रुग्णालय उभारण्यात यावे. मागील दहा वर्षात 27 गावांकडून कर वसुली मोठ्या प्रमाणात झाली परंतु त्यांचा विकास मात्र झाला नाही त्यामुळे सत्तावीस गावांचा विकासाचा निधी 27 गावांना परत करून त्यांचा विकास करण्यात यावा.

शास्त्रीनगर आणि रुक्मिणीबाई हॉस्पिटल सर्व सोयी सुविधांनी सुसज्ज करावे. लोढा हेवन पलावा विभागासाठी नवीन आरोग्य विभागाची इमारत मुख्य ठिकाणावी उभारावी. 27 गावांमध्ये अनेक गावांमध्ये पाणीपुरवठा अजूनही योग्यरीत्या केल्या जात नाही तो पाणीपुरवठा योग्यरीत्या करण्यात यावा.

### कल्याण डोंबिवली महानगरपालिकेतर्फे
# "Design Your Career" कार्यशाळेचे आयोजन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण डोंबिवली महानगरपालिका आणि स्टारसीड्स प्लेसमेंट्स अँड ट्रेनिंग कंपनी यांच्या संयुक्त विद्यमाने “Design Your Career” या प्रेरणादायी कार्यशाळेचे आयोजन आज (दि. 7 नोव्हेंबर 2025) आचार्य अत्रे रंगमंदिर, कल्याण (प.) येथे करण्यात आले. ही कार्यशाळा दहावी, अकरावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी विशेषतः घेण्यात आली होती, ज्यामध्ये मास्टर ट्रेनर श्री. नील वन्हाडपांडे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत करिअर निवड, उद्दिष्ट निश्चिती आणि वैयक्तिक विकासावरील सखोल मार्गदर्शन केले.या कार्यशाळेस कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे आयुक्त श्री. अभिनव गोयल प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. आपल्या प्रेरणादायी भाषणात त्यांनी विद्यार्थ्यांना उद्देशून सांगितले की — “प्रेशर म्हणजेच डायमंड तयार होण्याची प्रक्रिया आहे. जीवनात येणारा दबाव घाबरण्यासाठी नाही, तर अधिक मजबूत होण्यासाठी असतो. आपल्या शिक्षक, पालक आणि मित्रांशी संवाद ठेवा, आपल्या भावना शेअर करा — त्यामुळेच खरी प्रगती शक्य होते.”

त्यांनी पुढे सांगितले की फियर (भीती) हा नैसर्गिक घटक आहे, मात्र तो स्वीकारून मेहनतीद्वारे आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांनीच त्यावर मात करता येते. प्रत्येक विद्यार्थ्याने आपला पॅशन (आवड) शोधून त्यावर काम करावे आणि क्रिएटिव्हिटी वाढवण्यासाठी शैक्षणिक अभ्यासासोबत एखादी हॉबी ठेवावी, असेही त्यांनी सांगितले. आयुक्तांनी विद्यार्थ्यांना करिअर निवडीबाबत सकारात्मक दृष्टिकोन ठेवण्याचे आवाहन करत सांगितले की, “प्रत्येक मार्ग योग्य ठरतो, कारण तो

**विद्यार्थ्यांमध्ये करिअर नियोजन, आत्मविश्वास व सर्जनशीलतेचा जागर**
**— आयुक्त अभिनव गोयल यांचे मार्गदर्शन**

तुमच्यासाठी तयार केलेला असतो. स्वतःचा मार्ग शोधा, स्वतःवर विश्वास ठेवा, आणि आपल्या आवडीच्या क्षेत्रात सर्वोत्तम कामगिरी करा.”

कार्यक्रमाचे समन्वयक कार्यकारी अभियंता रोहिणी लोकरे होत्या. या प्रसंगी शेकडो विद्यार्थी व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी “Design Your Career” या कार्यशाळेतून प्रेरणा घेत आयुष्यात आपले ध्येय निश्चित करण्याचा संकल्प व्यक्त केला.

या कार्यक्रमाच्या यशामागे महापालिकेच्या कार्यकारी अभियंता रोहिणी लोकरे, आर्ट ऑफ लिव्हिंग शिक्षिका, यांचे विशेष योगदान राहिले. त्यांनी विद्यार्थ्यांसाठी घेतलेला प्राणायाम व ध्यान सत्र अत्यंत शांत, आनंददायी आणि मनःशांती देणारा ठरला.

या उपक्रमात शिक्षण अधिकारी भारत बोरनारे , तसेच विजय सरकटे यांचे समन्वयामुळे अनेक शाळांतील विद्यार्थ्यांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग सुनिश्चित झाला.

या कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनात StarSeeds टीममधील सह-संस्थापक ऋता वऱ्हाडपांडे आणि ऑपरेशन्स हेड कृतिका सपकाळ यांचेही मोलाचे योगदान राहिले. त्यांच्या समर्पणामुळे कार्यक्रम प्रभावी व सुयोजितरीत्या पार पडला.

ही कार्यशाळा युवकांमध्ये आत्मविश्वास, कौशल्य आणि योग्य दृष्टिकोन निर्माण करून त्यांना उज्ज्वल भविष्य आणि जबाबदार नागरिकत्वाच्या दिशेने प्रेरित करणारी ठरली.

## १२ डिसेंबरपासून आगरी महोत्सवाची मेजवानी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** आगरी समाजाचे समग्र दर्शन घडविणारा २१ वा अखिल भारतीय आगरी महोत्सव दि. १२ डिसेंबर २०२५ ते दि. १९ डिसेंबर २०२५ या कालावधीत श्री संत सावळाराम महाराज म्हात्रे क्रिडासंकुल डोंबिवली (पूर्व) येथे सर्वांच्या चेह-यावर हास्य फुलवण्यासाठी एका नव्या रंगात, नव्या ढंगात येत आहे.

सामाजिक, सांस्कृतिक, साहित्यिक, शैक्षणिक क्षेत्रातील भरीव कार्यामुळे लोकमान्यतेस पात्र ठरलेल्या "आगरी युथ फोरम" या सेवाभावी संस्थेच्यावतीने या सोहळ्याचे आयोजन करण्यांत येत आहे. लोकरंजनातून लोकशिक्षण लोकजागर करण्याचे व्रत आगरी महोत्सवने जपले आहे. त्या अंतर्गत अनेक ज्वलंत सामाजिक विषयांवर समाजमंथन करण्यासाठी प्रसिद्ध विचारवंतांची व्याख्याने, परिसंवाद आणि चर्चासत्र आयोजित करण्यांत येणार आहेत. हौशी कलाकारांच्या अंगभूत कलागुणांना उतेजना देण्यासाठी प्रसिद्ध नृत्यदिग्दर्शकांच्या मार्गदर्शनाखाली बहारदार नृत्यगीतांचे कार्यक्रम रंगणार आहेत. गृहिणी म्हणून यशस्वीरित्या जबाबदारी पार पाडणाऱ्या महिलांचे पारंपारिक नृत्यगीतांचे नृत्याविष्कार आपल्या मनाला सुखद आनंद देतील. त्याबरोबरच दररोज राजकिय, सामाजिक, साहित्यिक, कला क्रिडा, सिने, क्षेत्रातील अनेक नामवंत मान्यवरांची उपस्थिती हे महोत्सवाचे विशेष आकर्षण असणार आहे.

आगरी महोत्सव म्हणजे खरेदीदारांसाठी खरेदीचीही पर्वणीच असते. विविध गृहोपयोगी वस्तू, इलेक्ट्रॉनिक वस्तू, आगरी समाज संस्कृतीचे दर्शन घडवणारे स्टॉल, सुकी मासळी बाजार, खवैय्यांसाठी स्वादिष्ट आगरी पद्धतीच्या व इतर खाद्य पदार्थांचे स्टॉल तसेच सामाजिक संस्थांचेही स्टॉल असणार आहेत. सर्वांसाठी सर्वकाही देत असताना बच्चे कंपनीच्या मनोरंजनासाठी आकाश पाळण्यासारखी अनेक साधने उपलब्ध असणार आहेत. महोत्सवाच्या मंचावर सादर होणाऱ्या गीतनृत्याच्या सदाबहार सादरीकरणामुळे आबालवृद्ध चातकपक्षा प्रमाणे आगरी महोत्सवाची आतुरतेने वाट पाहत आहेत त्यामुळे येत्या महोत्सवात, आनंदाच्या पर्वणीमध्ये आनंद लुटण्यासाठी जनसागर उसळणार आहे. महोत्सव संयोजन समितीने कामाच्या स्वरूपानुसार विभाग समित्या स्थापन करून त्यांच्या कामकाजाला दोन महिन्यांपासून सुरवातही करण्यात आली असल्याचे २१ व्या अ. भा. आगरी महोत्सव संयोजन समितीचे अध्यक्ष शरद पाटील यांनी सांगितले. २१ वा अ. भा. आगरी महोत्सव आयोजनाच्या पूर्व तयारीचा आढावा घेण्यासाठी आयोजित सभेस आगरी युथ फोरमचे अध्यक्ष गुलाबराव वझे, उपाध्यक्ष शरद पाटील, कार्याध्यक्ष जालिंदर पाटील, खजिनदार पांडुरंग म्हात्रे, सचिव गुरूनाथ म्हात्रे, दिलीप देसले, संतोष संते, कांता पाटील, विश्वनाथ रसाळ, प्रकाश भंडारी, भानुदास भोईर, जयेंद्र पाटील, नारायण म्हात्रे, सदानंद म्हात्रे, प्रवीण पाटील, अशोक पाटील, अनंत पाटील हे उपस्थित होते. "एक आनंदाची पर्वणी" घेउन येणा-या या महोत्सवमधे सर्वांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन अ.भा. आगरी महोत्सव संयोजन समितीच्यावतीने करण्यांत आले आहे.

### सौ. कमलताई किसन कथोरे म्हसा महाविद्यालयात
# वंदे मातरम् सामूहिक गायन संपन्न



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**म्हसा :** वंदे मातरम् या राष्ट्रीय गीताला आज दीडशे वर्ष पूर्ण झाली या निमित्त राज्यात सगळीकडे वंदे मातरम् या गीताचं स्मरण करण्यात आलं. याच अनुषंगाने सौ. कमलताई किसन कथोरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय म्हसा येथे देखील दि. ०७ नोव्हेंबर २०२५ रोजी सामूहिक वंदे

**कार्यक्रम आयोजनची जबाबदारी क्रीडा प्रशिक्षक प्रा. दिनेश शेळके यांनी पार पाडली**

मातरम् गायन करून या राष्ट्रीय गीताचा स्मरणोत्सव साजरा करण्यात आला. या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. योगेश माळी सर तसेच महाविद्यालयातील ३६८ विद्यार्थी आणि १७ प्राध्यापक उपस्थित होते. या प्रसंगी विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. प्राचार्य माळी सरांनी उपस्थितांना वंदे मातरम् या राष्ट्रीय गीता संदर्भात सखोल अशी माहिती दिली. कार्यक्रम आयोजनची जबाबदारी क्रीडा प्रशिक्षक प्रा. दिनेश शेळके यांनी पार पाडली तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन प्रा. मयुरी घागस यांनी केलं.

# बदलापूरमध्ये कर्करोग तपासणी आणि जनजागृती शिबीर

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** ठाणे जिल्ह्यातील नागरिकांना सुलभ, दर्जेदार आणि सशक्त आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा परिषद ठाणे आणि इंडियन कॅन्सर सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने असंसर्गजन्य आजार तपासणी व जनजागृती शिबिर प्राथमिक आरोग्य केंद्र, बदलापूर येथे यशस्वीपणे पार पडले. हा उपक्रम जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ (भा.प्र.से.), मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. कैलास पवार आणि जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला.

या शिबिराचा उद्देश कर्करोगाचे लवकर निदान करून जीवन वाचविणे तसेच नागरिकांमध्ये जनजागृती वाढवून आरोग्यदायी जीवनशैलीकडे प्रवृत्त करणे हा होता. तपासणीदरम्यान मुखाचा कर्करोग, स्तनाचा कर्करोग आणि गर्भाशय मुखाचा कर्करोग या तीन प्रमुख





प्रकारांच्या तपासण्या करण्यात आल्या. याशिवाय डायबिटीस (मधुमेह) आणि उच्च रक्तदाब (हायपरटेन्शन) यांसारख्या असंसर्गजन्य आजारांची तपासणी देखील करण्यात आली.

शिबिरामध्ये तज्ञ डॉक्टरांच्या टीमने ३० वर्षांवरील नागरिकांची तपासणी केली. महिलांमध्ये गर्भाशय मुखाच्या कर्करोगाचे निदान HPV DNA टेस्ट आणि VIA टेस्टिंग द्वारे करण्यात आले. मुखरोग व स्त्रीरोग तज्ञांनी संपूर्ण आरोग्य तपासणी केली, तर फिजिशियन डॉक्टरांनी डायबिटीस व रक्तदाब तपासणी करून सल्ला दिला.

**नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद**

एकूण ५६ नागरिकांनी शिबिराचा लाभ घेतला, यामध्ये १३ पुरुष आणि ४३ महिला नागरिकांचा सहभाग होता.

शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी इंडियन कॅन्सर सोसायटीचे तज्ञ डॉक्टर आणि वैद्यकीय कर्मचारी उपस्थित होते. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र, बदलापूर येथील डॉ. प्रशांत कनोजा, डॉ. अश्विनी वाणे, आरोग्य सहाय्यिका शुभांगी नेवारे, आरोग्य सहाय्यक जितेंद्र बोरकर तसेच प्राची बढे आणि आरोग्य सेविका माया केदार यांनी सक्रिय सहभाग घेतला. UPHC कात्रप येथील आशा स्वयंसेविका संजीवनी पाटील, अश्विनी बनसोड आणि इतर स्वयंसेविका उपस्थित राहून नागरिकांना मार्गदर्शन केले.

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे यांनी सांगितले की, “कर्करोग, डायबिटीस आणि उच्च रक्तदाब हे आजार ग्रामीण भागातही वाढत आहेत. त्यामुळे नियमित तपासणी आणि आरोग्याविषयी जागरूकता अत्यंत आवश्यक आहे. नागरिकांनी वेळेवर तपासणी करून निरोगी जीवन जगावे.”

बदलापूर गाव आणि परिसरातील नागरिकांनी या शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. अनेकांनी प्रथमच कर्करोग तपासणी करून घेतली आणि आरोग्य विभागाच्या या उपक्रमाचे कौतुक केले. नागरिकांनी पुढील काळात अशी शिबिरे अधिक प्रमाणात आयोजित करण्याची अपेक्षा व्यक्त केली.





## क्रांतीकारक राघोजी भांगरे यांचे जयंती दिनी महापालिकेतर्फे अभिवादन !

क्रांतीकारक राघोजी भांगरे यांचे जयंती दिनी महापालिका मुख्यालयात आज महापालिका उपायुक्त सजंय जाधव यांनी क्रांतीकारक राघोजी भांगरे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी सहा.आयुक्त सविता हिले, मुख्य अग्निशमन दलाचे अधिकारी नामदेव चौधरी, माजी नगरसेविका शीतल मंडारी व इतर अधिकारी/ कर्मचारी आणि समाज बांधव उपस्थित होते.

# कल्याणनंतर आता डोंबिवलीतही नामांकित ब्रँड ‘ब्लॅकबेरीज’च्या भव्य स्टोअरचे उद्‌घाटन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** देशातील सुप्रसिद्ध मेन्सवेअर ब्रँड ब्लॅकबेरीजने आता डोंबिवलीतही आपले भव्य शोरुम सुरू केले आहे. डोंबिवली पूर्वेच्या लॉजिक एंटरप्रायझेस, युगंधर सुदामा ए-१ विंग, ग्राऊंड - पहिला मजला येथे अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत त्याचा उद्घाटन सोहळा संपन्न झाला. समाजसेवक आणि गिनिज बुक विक्रमवीर उदय जगताप यांनी सचिन शेलार यांच्या पुढाकाराने हे शोरुम सुरू केले आहे. उद्घाटन सोहळयावेळी अनेक मान्यवर उपस्थित होते. ज्यांच्या हस्ते याप्रसंगी ब्लॅकबेरीजच्या या हंगामातील नव्या फॅशन कलेक्शनचे अनावरणही करण्यात आले.

या नव्या स्टोअरमध्ये आधुनिक आणि स्टायलिश पुरुषांसाठी फॉर्मल तसेच कॅज्युअल परिधान, शर्ट्स, ब्लेझर्स, ट्राऊझर्स आणि आकर्षक ॲक्सेसरीजची विस्तृत श्रेणी उपलब्ध आहे. ग्राहकांना एकाच छताखाली जागतिक दर्जाची फॅशन आणि उत्कृष्ट सेवा अनुभवायला मिळणार आहे. काही वर्षांपूर्वी कल्याण पश्चिमेतही ब्लॅकबेरीजचे एक आकर्षक शोरूम सुरू करण्यात आले होते. अल्पावधीतच या



ब्रँडने परिसरातील फॅशनप्रेमी आणि अभिजात व्यक्तींच्या मनात विशेष स्थान मिळवले आहे. ब्लॅकबेरीज हे आता एलिगंट आणि स्टायलिश व्यक्तिमत्त्वाचे प्रतीक बनले आहे.

महाराष्ट्रातील वाढत्या फॅशन मार्केटमध्ये आपली उपस्थिती अधिक बळकट करत, ब्लॅकबेरीजने डोंबिवलीत केलेले हे नवीन पाऊल स्थानिक ग्राहकांसाठी नक्कीच एक मोठी भेट ठरेल असा विश्वास व्यक्त होत आहे. समाजातील तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, गुन्हेगारी प्रवृत्तीपासून दूर ठेवणे आणि सुधारगृहातून बाहेर पडलेल्या बंदीवानांचे पुनर्वसन या क्षेत्रांत सातत्याने कार्यरत असलेले उदय जगताप हे धनकवडी परिसरातील एक प्रेरणादायी व्यक्तिमत्व म्हणून ओळखले जातात.

उदय जगताप यांनी आपल्या आदर्श मित्र मंडळाच्या माध्यमातून १५० हून अधिक सुशिक्षित बेरोजगार तरुणांना विविध माध्यमांतून रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. समाजातील गुन्हेगारी प्रवृत्ती कमी करण्यासाठी त्यांनी ‘सुनहरे भविष्य’ ही विशेष योजना राबवली असून कारावास भोगून बाहेर आलेल्या व्यक्तींना नव्याने उभं राहण्यासाठीही रोजगार आणि आर्थिक मदत पुरवली जाते. तसेच, बंदीवानांसाठी दंतचिकित्सा, आरोग्य आणि शैक्षणिक पुनर्वसन उपक्रम ते सातत्याने राबवत आहेत. शाळा, महाविद्यालये, सामाजिक गणेशोत्सव मंडळे आणि युवक संघटनांच्या माध्यमातून त्यांनी तरुण पिढीत गुन्हेगारीविषयी जागरूकता निर्माण केली आहे. बाल गुन्हेगारी रोखण्यासाठी विशेष बालक-बालिका शिबिरांचे आयोजन केले जाते, तर परिसरातील विद्यार्थ्यांसाठी स्पोर्ट्स लायब्ररी सुरू करून विविध क्रीडा साहित्य मोफत उपलब्ध करून दिले जाते.

# उरण नगर परिषदेसाठी ठाकरे गट आघाडीतून तर भाजप स्वबळावर

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**उरण :** नगर परिषदेची निवडणूक जाहीर झाली असून उरणमध्ये भाजपने स्वबळाचा नारा दिला आहे. तर शिवसेना ठाकरे गटाने आघाडीसाठी चाचपणी सुरू केली आहे. निवडणूक जाहीर झाल्याने विविध पक्षांची कार्यालये पुन्हा गजबजून गेली आहेत. क वर्ग नगर परिषद असलेल्या उरण नगर परिषदेच्या नोव्हेंबर २०१६ मध्ये झालेल्या निवडणुकीत भाजपा, शिवसेना आणि शेकाप अशी तिरंगी लढत झाली होती.

यावेळी १८ जागा पैकी १३ जागा जिंकून भाजपाने नगराध्यक्षपदीही विजय मिळविला होता. उरणचे विद्यमान आमदार महेश बालदी यांच्या नेतृत्वाखाली भाजपने ही निवडणूक जिंकली होती. २०२१ मध्ये नगर परिषदेची मुदत संपुष्टात आली. त्यानंतर चार वर्षांनी ही निवडणूक होत आहे. आगामी निवडणुकीतही भाजप स्वबळावरच लढणार असल्याची माहिती बालदी यांनी दिली. तर शिवसेनेने महाविकास आघाडीचे घटक पक्ष असलेल्या शेकाप, काँग्रेस व शरद पवार यांची राष्ट्रवादी यांच्या सहकार्याने निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला असल्याची माहिती माजी आमदार व ठाकरे गटाचे नेते मनोहर भोईर यांनी दिली.

## थोडक्यात बातम्या

### कल्याणमध्ये पाणीबाणी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली :** मोहिली जलशुद्धीकरण केंद्रात विद्युत व यांत्रिकी उपकरणांची दुरुस्तीची कामे व 'अ' प्रभागातील जलवाहिन्यांच्या दुरुस्तीसाठी मंगळवारी, ११ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ ते रात्री ९ पर्यंत १२ तास मनपाच्या जलशुद्धीकरण केंद्रामधून कल्याण पूर्व, पश्चिम, मांडा टिटवाळा, वडवली, आंबिवली, शहाड, अटाळी, कल्याण ग्रामीणमधील अन्य गावांमधील पाणीपुरवठा बंद राहणार आहे.

### विक्रेत्यावर तलवारीने हल्ला

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे:** हातगाडीवरील विक्रेत्याने चायनीज देण्यास उशीर केल्याच्या रागातून संदीप जाधव (२५), प्रेम जाधव (२३) आणि रोहित जाधव (२०) या तिघांनी चायनीज विक्रेत्या कामागारांसह विक्रेते प्रथमेश शिंदे यांचे मित्र संदेश पाटील यांच्यावर तलवारीने पायाच्या पोटरीवर हल्ला करीत बघून घेण्याची धमकी दिली. याप्रकरणी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल झाल्याची माहिती वागळे इस्टेट पोलिसांनी शुक्रवारी दिली.

### खेळण्यातील नोटाद्वारे फसवणूक करणाऱ्यास अटक

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** लहान मुलांच्या खेळण्यातील नोटांचा वापर करून फसवणुकीचा डाव रचणाऱ्या एका टोळीचा पर्दाफाश कापूरबावडी पोलिसांनी केल्याची माहिती वागळे इस्टेटचे पोलिस उपायुक्त प्रशांत कदम यांनी शुक्रवारी दिली. भिवंडी येथील संजयकुमार पकौडीलाल भारती (४३) याला अटक केली असून, त्याच्याकडून खेळण्यातील एक कोटी ८० लाखांच्या नोटा आणि बनावट सोन्याच्या ३८ बिस्किटांचा साठा जप्त केला आहे. भारती याला ११ नोव्हेंबरपर्यंत पोलिस कोठडी सुनावली.

ठाण्यातील रहिवासी नितेश शेळके यांना आरोपींपैकी एकाने एक लाख रुपये दिल्यास तीन आठवड्यांत तीन लाख परत देतो, असे आमिष दाखवून त्यांना फसविण्याचा प्रयत्न केला. त्यांना यामध्ये संशय आल्याने त्यांनी कापूरबावडी पोलिसांकडे तक्रार दाखल केली. यातील एक जण साकेत बाळकूम रोडवर नोटा घेऊन येणार असल्याची माहिती मिळाली. त्याच आधारे ३ नोव्हेंबर रोजी भारती याला ताब्यात घेतले.तक्रारदारांकडून खऱ्या नोटांच्या बदल्यात खेळण्यातील नोटा देत असताना पोलिसांनी त्याला रंगेहाथ पकडले.

### दिव्यांगांना मिळणार योजनांचा लाभ

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** ठाण्यातील दिव्यांग बांधवांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न मार्गी लागणार आहे. खा. नरेश म्हस्के यांच्या पाठपुराव्यामुळे ठाणे पालिकेकडून दिव्यांगांसाठीच्या विविध योजनांच्या जाहिराती तातडीने प्रसिद्ध होणार आहेत. आचारसंहिता लागू होण्यापूर्वीच या योजनांची अंमलबजावणी व्हावी, यासाठी त्यांनी पालिकेच्या समाज विकास विभागाला स्पष्ट सूचना केल्या.

### अंबरनाथच्या नव्या पादचारी पुलावर घाणीचे साम्राज्य



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबरनाथ :** अंबरनाथ पूर्व व पश्चिमेला जोडणारा पूल नव्याने बांधण्यात आला. मात्र या पादचारी पुलावर घाणीचे साम्राज्य पसरले आहे. याकडे संबंधित प्रशासनाचे लक्ष जाणार कधी, असा सवाल येथून ये-जा करणारे प्रवासी करत आहेत.

# केडीएमसीतर्फे विद्यार्थी दिवस उत्साहात साजरा

## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेतून विविध उपक्रमांचे आयोजन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिनांक ७ नोव्हेंबर १९०० रोजी श्री. छ. प्रतापसिंह हायस्कूल, सातारा येथे इंग्रजी पहिल्या वर्गात प्रवेश घेतला होता. त्या दिवसाच्या स्मरणार्थ दरवर्षी ७ नोव्हेंबर हा दिवस "विद्यार्थी दिवस" म्हणून साजरा केला जातो. कल्याण-डोंबिवली महानगरपालिका शिक्षण विभागामार्फत सर्व प्राथमिक, माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये



७ नोव्हेंबर रोजी विद्यार्थी दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

या उपक्रमांतर्गत सर्व शाळांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, कविता वाचन, रंगोली स्पर्धा, वेशभूषा स्पर्धा अशा विविध उपक्रमांत विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. या प्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना आजचा प्रत्येक विद्यार्थी हा देशाचा भविष्यातील आधारस्तंभ आहे. शिक्षण हेच प्रगतीचे एकमेव साधन असून आदर्श विद्यार्थी घडविणे ही काळाची गरज असल्याचे सांगण्यात आले.

## अमृततर्फे मोफत
# ड्रोनपायलट प्रशिक्षणाची सुवर्णसंधी

**DGCA मान्यता प्राप्त प्रशिक्षणातून युवकांना नवे करिअर घडविण्याची संधी**

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**रायगड :** खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील युवक-युवतींसाठी महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधनी (अमृत) तर्फे मोफत ड्रोन पायलट प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रसार करून युवकांना रोजगारक्षम बनविणे आणि स्वयंरोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध करून देणे हे या उपक्रमामागचे प्रमुख उद्दिष्टआहे. या अंतर्गत 10 दिवसांचे प्रशिक्षण देण्यात येणार असून उमेदवारांना नागरिक उड्डाण महासंचालनालय (डीजीसीए) मान्यता प्राप्त प्रमाणपत्र दिले जाणार आहे. या प्रशिक्षणानंतर उमेदवारांना अधिकृत दूरसंवेदन पायलट परवाना मिळणार असून, कृषी, सर्वेक्षण, छायाचित्रण, चित्रफितनिर्मिती, नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन, शेतीमध्ये फवारणी व तपासणी अशा विविध क्षेत्रांत रोजगार आणि व्यवसायाच्या नव्या दिशा खुल्या होतील. प्रशिक्षणामध्ये मध्यम वर्ग ड्रोन प्रशिक्षण, लघु वर्ग ड्रोन प्रशिक्षण, प्रशिक्षक प्रशिक्षण, कृषी क्षेत्रातील ड्रोन वापर, वाहतूक आणि आपत्ती व्यवस्थापनातील ड्रोन वापर, नकाशांकन व सर्वेक्षण, ड्रोन देखभाल आणि सेवा प्रशिक्षण तसेच छायाचित्रण व चलचित्र निर्मिती प्रशिक्षण अशा एकूण आठ प्रकारचे अभ्यासक्रम समाविष्ट आहेत. प्रत्येक तुकडीत 15 विद्यार्थ्यांचा समावेश असेल. हे प्रशिक्षण रायगड पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, अमरावती, कोल्हापूर आणि परभणी या केंद्रांवर आयोजित करण्यात आले आहे. प्रशिक्षणासाठी अर्जदारांनी ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर प्राथमिक पात्रता परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक आहे.

या योजनेचा लाभ खुल्या प्रवर्गातील अशा समाजांना दिला जाणारआहे, ज्यांना कोणत्याही शासकीय महामंडळ किंवा संस्थेकडून समकक्ष योजना मिळत नाही. यामध्ये ब्राह्मण, मारवाडी, माहेश्वरी, गुजराती, सिंधी, राजपूत, कोमटी, पटेल, बंगाली, ठाकूर, पाटीदार आदी समाजांचा समावेश आहे. अर्जदार महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असावेत, कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न आठ लाख रुपयांपेक्षा कमी असावे आणि शैक्षणिक पात्रता किमान दहावी उत्तीर्ण असावी.अर्जदारांनी ओळखपत्र, अधिवास प्रमाणपत्र, चालू आर्थिक वर्षाचे उत्पन्न प्रमाणपत्र, फिटनेस दाखला तसेच शैक्षणिक पात्रतेचा पुरावा (शाळा सोडल्याचे दाखला किंवा प्रमाणपत्र) सादर करणे आवश्यक आहे. इच्छुक उमेदवारांनी www.mahaamrut.org.in, या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज भरावा. अर्जाची छापील प्रत सर्व कागदपत्रांसह स्वाक्षरीसह अमृतसंस्थेच्या अथर्व कॉम्प्लेक्स, नवगण कॉलेज रोड, बीड येथील जिल्हा कार्यालयात सादर करावी.

या संदर्भात अमृत संस्थेचे रायगड जिल्हा व्यवस्थापक शैलेश विनायक मराठे महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) मो. क्र.:९११२२२८७५९ तसेच उपव्यवस्थापक मंगेश भागुराम ढेबे मो. क्र.:८१४९५५२१४३ तसेच अमृतमित्र अश्विन अभय वाड मो. क्र.:९०११५४३६४५ यांच्याशी संपर्क साधावा.

## डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांच्या अध्यक्षतेखाली
# ठाणे जिल्ह्यातील बँकांची आढावा बैठक संपन्न



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** ठाणे जिल्ह्यातील सर्व बँकांची आढावा बैठक दि.०७ नोव्हेंबर २०२५ रोजी जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात पार पडली. या बैठकीस भारतीय रिझर्व्ह बँक, नाबार्ड, प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक अभिषेक पवार, जिल्हा उद्योग केंद्राच्या महाव्यवस्थापक सोनाली देवरे, RSETI संचालक, ठाणे, सर्व बँकांचे जिल्हा समन्वयक, राज्य शासनाच्या विविध महामंडळांचे प्रतिनिधी तसेच इतर संबंधित अधिकारी उपस्थित होते. बैठकीत जिल्हाधिकारी डॉ.पांचाळ यांनी ठाणे जिल्ह्यातील सर्व बँकांच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला. प्रामुख्याने वार्षिक कर्ज योजना (ACP) 2025-26, शासकीय प्रायोजित योजना (PMEGP, CMEGP, PM Vishwakarma, PMFME, Stand-Up India, Mudra), तसेच आर्थिक समावेशन आणि सामाजिक सुरक्षा योजना (PMJJBY, PMSBY, APY) या विषयांवर चर्चा केंद्रित होती. तसेच पीएम स्वनिधी योजना, RSETI व FLC च्या कामकाजाचा आढावा आणि DFS व RBI तर्फे राबविण्यात आलेल्या निष्क्रिय ठेवींसंदर्भातील जनजागृती मोहिमेवर देखील विचारविनिमय झाला. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी सर्व बँकांना निर्देश दिले की, प्रलंबित प्रकरणे त्वरीत निकाली काढावीत, प्राधान्य क्षेत्र कर्ज वितरणाचे उद्दिष्ट पूर्ण करावे, तसेच सर्व शासकीय योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत वेळेत पोहोचवावा.

# डोंबिवलीत जीवन प्रमाणपत्र शिबीर

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली :** डोंबिवली टिळकनगर सार्वजनिक गणेशोत्सव मंडळातर्फे निवृत्ती वेतनधारकांच्या बँकांमध्ये जीवन प्रमाणपत्रासाठी (हयातीच्या दाखल्यासाठी) लागणाऱ्या लांबलचक रांगांपासून मुक्तता व्हावी, या उद्देशाने सलग पाच वर्षे विनामूल्य ऑनलाइन जीवन प्रमाणपत्राच्या चार दिवसांच्या शिबिराचे आयोजन ६ ते ९ नोव्हेंबर या कालावधीत मंडळाच्या कार्यालयात केले आहे.

मागील दोन दिवसांत २५० निवृत्ती वेतनधारकांनी या उपक्रमाचा लाभ घेतला. निवृत्ती वेतनधारकांना ऑनलाइन जीवन प्रमाणपत्र बनवून देण्याच्या कामात मंडळाचे माधव मराठे, सुनील जोशी आणि सुहास वैद्य यांनी योगदान दिले. आजारी, अंध, वॉकर घेऊन चालणाऱ्या निवृत्ती वेतनधारकांना रांग न लावता लगेच जीवन प्रमाणपत्र बनवून देण्यात आले. जास्तीत जास्त निवृत्ती वेतनधारकांनी उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन मंडळाचे सहकार्यवाह केदार पाध्ये यांनी केले. आजारी तसेच घराबाहेर पडू न शकणाऱ्या वयोवृद्ध निवृत्ती वेतनधारकांचे प्रमाणपत्र त्यांच्या घरी जाऊन करून देण्याचा मंडळाचा प्रयत्न असेल, असे कार्यवाह संजय शेंबेकर म्हणाले.

# चारित्र्याच्या संशयातून पत्नीची हत्या

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर :** वरप गावातील विश्वजीत प्रिअर्स सोसायटीत राहणाऱ्या संतोष पोहळ याने चारित्र्याच्या संशयातून पत्नीची गुरुवारी रात्री गळा चिरून हत्या केली. त्यानंतर चाकूने स्वतःवर वार करीत संतोषने आत्महत्येचा प्रयत्न केला. याप्रकरणी टिटवाळा पोलिस ठाण्यात पतीवर हत्येचा गुन्हा दाखल झाला असून गंभीर जखमी झालेल्या संतोष वर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

संतोष हा पत्नी विद्या आणि दोन मुलांसह राहत होता. संतोष हा चालक म्हणून काम करीत होता. तर पत्नी विद्या ही टाटा मोटर्समध्ये कामाला होती. त्यांच्यात काही दिवसांपासून चारित्र्याच्या संशयावरून सतत वाद सुरू होते, असे पोलिस तपासात उघड झाले. गुरुवारी रात्री १० च्या सुमारास राहत्या

**१० च्या सुमारास रात्री घरातच त्यांच्यातील वाद विकोपाला**

घरातच त्यांच्यातील वाद विकोपाला गेला.

संतोषने रागाच्या भरात धारदार चाकूने पत्नीचा गळा चिरून वार करून हत्या केली. त्यानंतर स्वतःवरही वार करत आत्महत्येचा प्रयत्न केला. घटनेची माहिती म्हारळ पोलिस चौकीचे प्रमुख दत्तात्रय नलावडे यांना मिळाल्यावर त्यांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. गंभीर जखमी असलेल्या पतीपत्नीला उपचारासाठी दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान विद्या हिचा मृत्यू झाला, तर संतोषची प्रकृती चिंताजनक असून पुढील उपचारासाठी मुंबई येथे हलविण्यात आले.

# पेण नगरपालिका निवडणुकीसाठी प्रशासन सज्ज

## विनापरवानगी बॅनर वा पोस्टर लावल्यास तात्काळ कारवाई

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण :** पेण नगरपरिषद निवडणुकीसाठी प्रशासन सज्ज झाले असून आगामी निवडणुकीची लगबग आता सुरू झाली असून आदर्श आचारसंहितेची अंमलबजावणी प्रशासनाने कडक पद्धतीने सुरू करण्यात आली असल्याची माहिती पत्रकार परिषदेत निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसिलदार तानाजी शेजाळ यांनी दिली. यावेळी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तुषार कामत, नवनिर्वाचित पेण न.प. मुख्याधिकारी अभिषेक पराडकर उपस्थित होते. आचारसंहिता काळात विनापरवानगी नवीन बॅनर वा पोस्टर लावल्यास आयोगाच्या नियमांनुसार संबंधित पक्ष किंवा इच्छुक उमेदवारांवर तात्काळ कारवाई केली जाईल, असा इशारा निवडणूक विभागाने दिला आहे. पेणमधील निवडणूक वातावरण दिवसेंदिवस तापत असून, प्रशासनही आदर्श आचारसंहिता तंतोतंत पाळली जावी यासाठी सज्ज झाले आहे.



पेण न.प.प सभागृहात झालेल्या पत्रकार परिषदेत माहिती देताना तानाजी शेजाळ यांनी संगितले कि, पेण न. प. निवणुकीसाठी १२ प्रभाग असणार आहेत. यामध्ये २४ नगरसेवक व एक नगराध्यक्ष पदासाठी निवडणूक होणार असून ३३८७५ मतदार आहेत. यामध्ये पुरुष मतदार १६६०४ व स्त्री मतदार १७२७१ आहेत. तसेच पेण निवडणूक कार्यक्रम जाहीर होताच पालिका प्रशासनाने शहरातील राजकीय बॅनर्स, पोस्टर्स हटवण्याची मोहीम राबवली. या मोहिमेत ४८ बॅनर्स व १४ भित्तीपत्रके हटवण्यात आली असून राजकीय उल्लेख असलेल्या २६ कोनशिला झाकण्यात आल्या आहेत. दुबार मतदारांच्या पडताळणीसाठी विशेष उपक्रम सुरू करण्यात आला असून दुबार नावे असलेल्या मतदारांची यादी पालिकेच्या फलकावर लावण्यात येणार आहे. संबंधित मतदारांनी आपले नेमके मतदान केंद्र स्पष्ट करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

उमेदवारांनी आपले फार्म ऑनलाईन पद्धतीने भरावयाचे असून ज्या कोणाला अडचण येत असेल त्यासाठी मार्गदर्शन केंद्र उभारण्यात आले आहे. तसेच कोणचे काही सूचना, तक्रार असेल त्यासाठी हि मदत कक्ष उभारण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले.

# कल्याण येथे ६४ व्या मराठी राज्य नाट्य स्पर्धेला सुरुवात

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत आयोजित ६४ वी हौशी राज्य नाट्य स्पर्धा प्राथमिक फेरी 11नोव्हेंबर पासून कल्याण पश्चिम येथील आचार्य अत्रेरंगमंदिर येथे सुरू होत आहे. दिनांक 11नोव्हेंबर ते 4 डिसेंबरच्या दरम्यान रोज संध्याकाळी ७ वाजता नाटकाचे प्रयोग सादर होणार आहेत.

सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार व सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य नाट्य स्पर्धा पार पडणार असल्याचे सांस्कृतिक कार्य संचालक विभीषण चवरे यांनी नमूद केलेले आहे. या स्पर्धेमध्ये एकूण १८ संघांचा सहभाग असून ठाणे जिल्ह्यातील संघ या स्पर्धेत सहभागी होणार आहेत. या नाट्य स्पर्धेत बुद्धिबळ आणि झब्बू, इनोसंट, फैसला, इन दि सर्च ऑफ, ऑरी, कृष्णविवर, चामखीळ, अजातशत्रू, कॉर्पोरेट घाशीराम, 1 ते 4 बंद, फेन्ट, गणपति वप्प मोरिय, निब्बाण, बाई शिवाय लग्न, काजळमाया, दगडी भिंत, अचाट नगरचा विवाह सोहळा, कांतार हि नाटके सादर केली जाणार आहेत.

राज्यनाट्य स्पर्धेतील सर्व नाटकांना जास्तीत जास्त प्रेक्षकांनी उपस्थित राहावे आणि हौशी रंगकर्मींचा उत्साह वाढवावा असे आवाहन संचालक बिभीषण चवरे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी समन्वयक शिवाजी शिंदे (8828390949) यांच्याशी संपर्क साधावा.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!
१ बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) कालावधी १ वर्ष
२ पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) कालावधी १ वर्ष
३ जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) कालावधी १ वर्ष
४ डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) कालावधी २ वर्ष
५ सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११११२४) कालावधी ६ महिने
पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

news.thanejeevandeep@gmail.com
दैनिक ठाणे जीवनदीप
WhatsApp Channels
महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुंबई ■ नवी मुंबई ■ ठाणे ■ पालघर ■ रायगड
9619188558 / 9082664781
www.jeevandeepvarta.com/
आपलं हक्काचं दैनिक, दररोज वाचा.

# कु.श्रेयांश व कु.काशि यांच्या पालकांनी किंवा नातेवाईकांनी ठाणे बाल कल्याण समितीशी संपर्क साधावा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** कु.श्रेयांश (वय 2 महिने) हा बालक दि.30 जून 2025 रोजी सिवूड्स रेल्वे स्टेशन परिसरात आणि कु. काशी (वय 3 महिने) ही बालिका दि.25 ऑक्टोबर 2025 रोजी काशिगाव पोलीस ठाणे यांना मॉर्डन कंपनी, वेलकर नगरच्या झोपडपट्टी जवळ, काशिगाव येथे काशिगाव पोलिसांना बेवारस सापडले आहेत. या दोन्ही बालकांना विश्व बाल केंद्र, नेरुळ, नवी मुंबई या बालगृहामध्ये पुनर्वसनाकरिता दाखल करण्यात आले आहे.

तरी कु.श्रेयांश व कु.काशि या दोन्ही बालकांच्या पालकांनी किंवा नातेवाईकांनी एक महिन्याच्या आत संबंधित पोलीस ठाणे, बाल कल्याण समिती, ठाणे किंवा विश्व बाल केंद्र, नेरुळ, नवी मुंबई, बालगृह, दूरध्वनी क्रमांक 27720765/9167209767 येथे संपर्क साधावा, असे आवाहन ठाणे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी नमिता शिंदे यांनी केले आहे.

Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com * RNI NO : MAHMAR/2016/72091 * Postal Reg. No. THC/256/2022-2024